**विशेष लेख क्र.** १५ फाल्गुन १९२९ शके (सायं.५.३० वा.)
**८ मार्च-जागतिक महिला दिन** बुधवार, दि. ५ मार्च २००८

# सन्मान स्त्री शक्तीचा...

*स्त्री ही माता, पत्नी व बहिण अशा तीन रुपातून आपले उत्तरदायित्व पार पाडीत असते. हे करीत असताना सामाजिक, आर्थिक व कौटुंबिक समस्यांना धैर्याने सामोरे जाऊन ती आपले जीवन मार्गक्रमित असते. स्त्री ही दोन घराण्यांचा सेतू असल्याने स्त्री शिक्षणाची मोहीम प्रभावीपणे राबविणे समाजाच्या एकूण विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचं आहे, असा विचार महात्मा गांधींनी समाजाला दिला. ८ मार्च हा दिवस जागतिक महिला दिन म्हणून साजरा केला जातो. या मंगलमय दिनाचे औचित्य साधून या भारतभूमीचे नाव सातासमुद्रापलीकडे अजरामर करणाऱ्या काही थोर समाजसुधारक व राज्यकर्त्या महिलांच्या कार्यावर प्रकाश टाकणे आवश्यक आहे. स्त्रियांमध्ये आत्मविश्वास निर्माण करुन त्यांना आत्मनिर्भर करण्यात या थोर महिलांचं मोठं योगदान आहे. स्त्रियांना शिक्षित करुन त्यांना आपल्या हक्कांची जाणीव करण्यात त्यांनी आपलं सारं आयुष्य वेचलं. जागतिक महिला दिनानिमित्त त्यांच्या कार्यकर्तृत्वावर टाकलेला हा दृष्टीक्षेप...*

## राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील

महाराष्ट्रातील एक बहुआयामी व्यक्तिमत्त्व आज राष्ट्रपती या सर्वोच्च पदावर विराजमान झालं, याचा प्रत्येक महाराष्ट्रीय माणसाला सार्थ अभिमान आहे. समाजकारणासाठी राजकारण करुन त्यास शुद्धचारित्र्य व सात्विक आचारविचाराची जोड दिली आहे ती श्रीमती प्रतिभाताई पाटील यांनी. 'सर्वसामान्य माणूस' हा केंद्रबिंदू मानून त्याचे प्रश्न कसे मार्गी लागतील, यासाठी त्या आजही सातत्याने प्रयत्नशील आहेत. प्रतिभाताई ह्या भारतातील पहिल्या महिला राष्ट्रपती म्हणून गणल्या गेल्याने महाराष्ट्राच्या राजकीय व सांस्कृतिक वैभवात आणखी एक मानाचा शिरपेच खोवला गेला आहे. इतकेच नव्हे तर, एका महिलेला हा बहुमान प्राप्त झाल्याने, भारतीय राजकारणात एका नव्या पर्वाला सुरुवात झाली आहे. महिलांचे प्रश्न सोडविण्यासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर आयोजित महिला परिषदांमध्ये भारताचे प्रतिनिधी म्हणून प्रतिभाताईंनी ऑस्ट्रिया, जर्मनी, इग्लंड, अमेरिका, बल्गेरिया, नैरोबी, जपान, स्वित्झर्लंड, हाँगकाँग, इंडोनेशिया या देशांमध्ये भ्रमण करुन महिलांच्या ज्वलंत प्रश्नांवर आपली ठाम भूमिका मांडली. वयाच्या २७ व्या वर्षीच जळगाव मतदारसंघातून १९६२ मध्ये विधानसभेवर निवडून आल्या. राज्य मंत्रिमंडळात त्यांनी विविध मंत्रीपदे भूषवून जनमानसावर आपल्या कार्याचा ठसा उमटविला. नंतर विरोधी पक्षनेत्या, राज्यसभेच्या उपाध्यक्ष, काँग्रेस प्रदेशाध्यक्षपद, अमरावती लोकसभा मतदारसंघाच्या खासदार, राजस्थानच्या राज्यपाल आणि आता राष्ट्रपती या सर्वोच्च पदावर विराजमान झाल्या. समाजातील स्वावलंबी महिला स्वकर्तृत्वावर जीवन व्यतीत करण्यासाठी नोकरी कामधंदा करतात, अशांना एक मायेचा आधार देण्याच्या उद्देशाने ताईंनी मुंबई व दिल्ली येथे वर्किंग वुमेन्स हॉस्टेलची निर्मिती करुन महिलांना आत्मनिर्भर जीवन जगण्याचा मंत्र दिला. महाराष्ट्राची सुकन्या आज भारताच्या राष्ट्रपती झाल्याने आता देशात महिला सबलीकरण मोहिमेला खऱ्या अर्थाने चालना मिळेल, याचा आम्हांला विश्वास आहे.

..२/-

## प्रियदर्शिनी इंदिरा गांधी

भारतातील प्रत्येक खेड्यापाड्यात, घराघरात परिचित असलेला तो शालीन व नेतृत्त्व गुणसंपन्न चेहरा कोणता असा प्रश्न केल्यास त्याचं एकमेव उत्तर म्हणजे इंदिरा गांधी. इंदिराजी आपल्या कार्यकर्तृत्त्वाने भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान झाल्या. इतकेच नव्हे, तर, त्यांना 'भारतरत्न' हा सर्वोच्च पुरस्कारही प्रदान करण्यात आला. खरं तर, नेहरु घराण्याला देशभक्तीचा एक वारसाच लाभला होता. महात्मा गांधींच्या ब्रिटिश राजवटीविरुद्ध उभारलेल्या चलेजाव आंदोलनात इंदिराजींनी स्वेच्छेने भाग घेतला. जगातील महाशक्तींवर विसंबून न राहता प्रत्येक क्षेत्रात आपण स्वयंसिद्ध असावयास पाहिजे, अशी त्यांची ठाम भूमिका होती. आधुनिक तंत्रज्ञानाचा अंगिकार करुन इंदिराजींनी राजस्थानमधील पोखरण येथे अणुशक्तीची चाचणी यशस्वीपणे घडवून आणली. तिसऱ्या जगताचा वादातीत आवाज म्हणून त्यांची ओळख होती. अलिप्तवादी व विकसनशील देशांच्या त्या खऱ्या अर्थाने नेत्या होत्या. १९७१ चे पाकिस्तानशी युद्ध व त्यावर केलेली मात, बांगला देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यात घेतलेली मुख्य भूमिका, सुवर्णमंदीरातील ऑपरेशन ब्लू स्टार लष्करी कारवाई, बँकांचे राष्ट्रीयीकरण या घटनांना आकार देण्याची महत्त्वपूर्ण भूमिका त्यांनी समर्थपणे बजावली. आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या नेत्या म्हणून त्या विश्वात गणल्या गेल्या. १९८३ मध्ये जगातील तटस्थ राष्ट्रांच्या गटाच्या अध्यक्षपदी इंदिराजींची बिनविरोध निवड झाली होती. भारत-रशिया यांचे संबंध वृद्धींगत करण्यात इंदिराजींचा सिंहाचा वाटा होता. **माझ्या रक्तातील प्रत्येक थेंबन-थेंब देशासाठी असेल** असे त्यांचे उद्‌गार जणू मृत्यूची चाहूलच देऊन गेले. इंदिराजींच्या देशभक्तीचे हे एक ज्वलंत उदाहरण होय.

## राजमाता जिजाबाई

राजमाता जिजाबाईंचे मोठेपणे केवळ त्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या माता होत्या एवढ्याच ऐतिहासिक सत्यात सामावलेलं नव्हतं, तर त्या स्वराज्य माताही होत्या. छत्रपतींनी प्रजाहितदक्ष व एक आदर्श राजा व्हावा, यासाठी जिजाऊंनी त्यांच्यावर संस्कार जडवून त्यांना सर्वगुणसंपन्न केलं. जिजाऊ ह्या शिवबाच्या केवळ जन्मदात्री नव्हे, तर त्यांची ती स्फूर्ती, प्रेरणा, मार्गदर्शिका व मायेची सावली होती. जिजाऊंनी शिवबात दुर्दम्य राष्ट्रप्रेमाची भावना निर्माण केली. शिवबाला युद्धतंत्राचे शिक्षण देण्यासाठी त्यांनी दादोजी कोंडदेव यांची नेमणूक केली. शिवबाला मराठी साम्राज्याचा आदर्श राजा बनविण्यासाठी जिजामाताने रामाचा पराक्रम, भीमार्जुनाचे युद्धकौशल्य, युद्धिष्ठिराची धर्मनिष्ठा व श्रीकृष्णाची रणनितीची शिकवण दिली. जिजाऊंनी प्रत्येक मावळ्याची शिवबांऐवढीच काळजी घेऊन त्यांना युद्धात पारंगत केलं. इतकेच नव्हे तर, शिवबाला एक पराक्रमी व थोर योद्धा बनविण्यासाठी जिजामातेने स्वत:देखील लष्करी शिक्षण घेतले. तलवार चालविणे, तिरंदाजी, भाल्याची फेक, घोडेस्वारी यात त्या तरबेज होत्या. राज्याभिषेकप्रसंगी आशिर्वाद देताना जिजाऊ शिवरायांना म्हणाल्या, **सिंहासनाच्या थोरवीमुळे राजा थोर होत नाही, तर राजाच्या थोरवीमुळे सिंहासन थोर होते.** अशा आदर्श मातेची थोरवी सांगावी तेवढी थोडीच.

## क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले

स्त्री शिक्षणाच्या अग्रदूत आणि स्त्री स्वातंत्र्याच्या प्रणेत्या सावित्रीबाई फुले यांनी समाजात स्त्री-पुरुष समानता प्रस्थापित करण्यासाठी स्त्रीमुक्ती आंदोलन उभारुन महिलांमध्ये जागृती निर्माण केली. सावित्रीबाई ह्या खऱ्या अर्थाने भारतातल्या आद्य शिक्षिका म्हणून गणल्या गेल्या. त्यांनी बालविवाह प्रतिबंध, विधवा विवाहास प्रोत्साहन, तर केशवपन प्रथेचे उच्चाटन केले. बालविवाहाला विरोध करुन त्या थांबल्या नाहीत, तर विधवांच्या पुर्नविवाहास मान्यता देण्यास इंग्रज सरकारला भाग पाडलं. स्त्रियांमधील अज्ञान, भित्रेपणासारखे न्यूनगंड घालविण्याच्या दृष्टीने सावित्रीबाईंनी १ जानेवारी १८४८ रोजी पुणे येथे मुलींची पहिली शाळा सुरु केली. ह्या शाळेने पुढे भारतातली पहिली मुलींची शाळा म्हणून लौकिक मिळविला. **विद्या हे धन आहेरे! श्रेष्ठ साऱ्या धनाहून! तिचा साठा जयापाशी! ज्ञानी तो मानती जन!** असा मोलाचा संदेश सावित्रीबाईंनी दिला. स्त्री शिक्षणाला मज्जाव करणाऱ्या कर्मकांडी समाजाला न जुमानता, या क्रांतीज्योतीने ज्ञानाचा दीप पेटवून साऱ्या समाजाला प्रकाशमान केलं. जातीभेद, वर्णभेद, मानसिक गुलामगिरी यातून समाजाला मुक्त करण्यासाठी सावित्रीबाई ह्या महात्मा ज्योतिबा फुलेंच्या पाठीशी खंबीरपणे उभ्या राहिल्या. १९ व्या शतकात स्त्री शिक्षण क्षेत्रात सावित्रीबाईंनी केलेली कामगिरी अद्वितीय ठरली. **जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगाते उद्धारी** हे सावित्रीबाईंनी आपल्या कृतीने सिद्ध करुन दाखविलं.

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर

आदर्श राजा म्हटलं म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांची मूर्ती डौळ्यासमोर येते, तर आदर्श राज्यकर्ती म्हटलं की, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव पुढे येते. आदर्श कन्या, आदर्श पत्नी, प्रेमळ माता व प्रजाहितदक्ष राज्यकर्ती अशा वैविध्य भूमिकेतून त्यांनी जनसेवा केली. स्वकर्तृत्वाच्या बळावर अहिल्यादेवींनी होळकरांच्या राजकारणाची धुरा समर्थपणे सांभाळून सर्व जाती-धर्मातील लोकांना समान न्याय दिला. परधर्माप्रति त्यांच्या मनात नितांत आदर व सहिष्णुता होती. त्यामुळे त्यांच्या राज्यात सर्वधर्मीय गुण्यागोविंदाने नांदले. वैधव्याच्या दु:खात व पुत्रशोकाने होरपळून निघालेल्या या कर्तृत्ववान व धाडसी महिलेने धिरोदत्तपणे निधड्या अंत:करणाने मल्हारराव होळकरांच्या या सुनेनं मराठी साम्राज्याचा सूर्य तळपत ठेवला आणि **मरावे परी कीर्तिरुपे उरावे** ही उक्ती खरी करुन दाखविली. राज्यातील कालबाह्य कायद्यांमध्ये सुधारणा करुन त्यांनी विधवा महिलेला मूल दत्तक घेण्याचा अधिकार बहाल केला. एवढेच नव्हे तर, विधवांचे धन जप्त करुन ते राजकोषात जमा करण्याची जुलमी प्रथा देखील बंद केली. राज्यातील सर्व धर्मीयांना तसेच शेजारील राजेरजवाड्यांना विश्वासात घेऊन अहिल्यादेवीसारख्या एका विधवा महिलेने जवळपास २८ वर्षे राज्यकारभाराची धुरा समर्थपणे सांभाळली, या घटनेला साऱ्या जगतात तोड नाही.

## सारांश....

जागतिक महिला दिनानिमित्त आत्मचिंतन केल्यास **चूल आणि मूल** ही संकल्पना आता कालबाह्य होत चालली आहे. स्त्रिया आता शिक्षणासह अनेक क्षेत्रात आघाडी घेताना दिसत आहेत. घरा-घरात आज मुली शिक्षण घेताना दिसत आहेत. त्या कोणावरही विसंबून न राहता, आत्मनिर्भर होण्याचा प्रयत्न करीत आहेत. प्रत्येकामध्ये शिक्षणाविषयी आवड निर्माण झाली आहे. दहावी-बारावीच काय, पण अन्य परीक्षांची मेरिटलिस्ट पाहिल्यास त्यातही मुलीच आघाडीवर असल्याचे निष्पन्न होते. शिक्षण, राजकारण, उद्योग,

तंत्रज्ञान, विज्ञान, प्रशासकीय सेवा अशा अनेक क्षेत्रात महिला आगेकूच करीत आहेत. जागतिक महिला दिन साजरा करण्याचं हे जणू फलितच म्हणावयास पाहिजे.

रणवीर रजपूत
वरिष्ठ सहाय्यक संचालक, मंत्रालय

०००